OFFICE OF THE COLLECTOR * NANDED *

# <u>अधिसुचना</u> (कलम 19)

क्र.2019/आरबी/डेस्क-3/भुसं/सिआर-67
जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड
दिनांक- /01/2020
05/02/2020

## भूमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना उचित नुकसान भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, 2013

क्रं.2018/म-2/भूसं/एलएनक्यु/अविअभो/प्र.क्र.02 ज्याअर्थी, समुचित शासन असलेल्या नांदेड जिल्हयाच्या जिल्हाधिका-याने, भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, 2013 (2013 चा 30) (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त अधिनियम" असा केला आहे) यांच्या कलम 11 च्या पोट कलम (1) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन, **अधिसुचना क्रमांक 04 दिनांक 19 सप्टेंबर 2019 अन्वये** प्रारंभिक अधिसूचना काढली आहे. आणि त्याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, यासोबत जोडलेल्या अनुसूची एक मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमिनीची, अनुसुची दोन मध्ये अधिक तपशीलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी **कार्यकारी अभियंता, उर्ध्व पेनगंगा प्रकल्प विभाग क्र.8, नांदेड** विभागाच्या खर्चाने करण्याची आवश्यकता आहे.

आणि ज्याअर्थी, नांदेड (जिल्हयाच्या) जिल्हाधिका-याने, कलम 15 च्या पोटकलम (2) अन्वये दिलेला अहवाल, कोणताही असल्यास, विचारात घेतल्यानंतर, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीन संपादित करण्याची आवश्यकता आहे याबाबत त्याची खात्री पटली आहे; आणि म्हणुन, उक्त अधिनियमाच्या कलम 19 च्या पोटकलम (1) च्या तरतुदींन्वये, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनीची आवश्यकता आहे असे याद्वारे घोषित करण्यात येत आहे;

आणि ज्याअर्थी, अनुसुची तीन मध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेले क्षेत्र हे बाधित कुटुंबियांच्या पुनर्वसन व पुनर्वसाहतीच्या प्रयोजनासाठी "पुनर्वसाहत क्षेत्र" म्हणुन निर्धारित केले असल्याचे याद्वारे घोषित केले जात असून, पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश अनुसूची चार मध्ये विनिर्दिष्ट केला आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम 3 च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिका-यांची कार्ये पार पाडण्यासाठी **उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, भोकर** यास पदनिर्देशित करीत आहे.

## अनुसूची- एक
## संपादित करावयाच्या जमिनीचे वर्णन

गावाचे नांव: मौ. चिकाळा (तांडा) तालुका : मुदखेड जिल्हा : नांदेड

| अ.क्र. | भुमापन क्रमांक किंवा गट नंबर | क्षेत्र (हेक्टर मध्ये) | सोडुन देण्यात आलेले जमीनीचे आदमासे क्षेत्र हे.आर. |
|---|---|---|---|
| 1 | 1 | 0.42 | - |
| 2 | 1 | 0.06 | |
| 3 | 1 | 0.05 | |
| 4 | 1 | 0.02 | |
| 5 | 15 | 0.01 | |
| 6 | 17 | 0.05 | |
| 7 | 18 | 0.10 | |
| 8 | 28 | 0.09 | |
| 9 | 43 | 0.02 | |
| | एकूण | 0.82 हे. आर | |

## अनुसूची - दोन
## सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाबाबत विवरण

प्रकल्पाचे नांव :- भूसंपादन प्रस्ताव इसापूर उजवा कालवा /डोणगांव वितरीका सा.क्र. 3690 मी. वरील हज्जापूर वितरीका सा.क्र. 725 वरील डावा लघु कालवा क्र.1 (सा.क्र 23 ते 1620 मी.) मधील शिल्लक सा.क्र. 325 ते 580 मी सा.क्र. 1180 ते 1225 आणि सा.क्र.1590 ते 1620 मी. लांबीतील कामासाठी

प्रकल्पाच्या कामाचे वर्णनः- भूसंपादन प्रस्ताव इसापूर उजवा कालवा/डोणगांव वितरीका सा.क्र. 3690 मी. वरील हज्जापूर वितरीका सा.क्र. 725 वरील डावा लघु कालवा क्र.1 सा.क्र 23 ते 1620 मी. मधील शिल्लक सा.क्र. 325 ते 580 मी सा.क्र. 1180 ते 1225 आणि सा.क्र.1590 ते 1620 मी. लांबीतील कामासाठी मौ. चिकाळा (तांडा) ता. मुदखेड

समाजाला होणारे लाभ :- जलसिंचन.

## अनुसुची - तीन
## पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन

गावाचे नांव : मौ. चिकाळा (तांडा) तालुका : मुदखेड जिल्हा : नांदेड

| अ.क्र. | भुमापन क्रमांक किंवा गट नंबर | क्षेत्र (हेक्टर मध्ये) |
|---|---|---|
| - | - लागु नाही - | ------- |

अनुसुची – चार

( **पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश** )

- लागु नाही -

**टिप :-** उक्त जमिनीच्या नकाशाचे निरीक्षण **उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी भोकर** यांचे कार्यालयात करता येईल.

**दिनांक :** 05/02/2020

**ठिकाण :** नांदेड

**जिल्हाधिकारी नांदेड**